RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - २ रे ❏ अंक -२१४ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि.२१ सप्टेंबर २०२४ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## ‘या’ तीन घराण्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये दहशत पसरवली अमित शाहांचा विरोधकांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१जम्मू-काश्मीर :**

जम्मू-काश्मीर विधानसभेसाठी निवडणुकीत होत आहे. यासाठी राजकीय पक्षांकडून प्रचार केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज जम्मू-काश्मीरमधील मेंढर येथे एका जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी विरोधकांवर सडकून टीका. ही निवडणूक तीन घराण्यांची राजवट संपवणार आहे. अब्दुल्ला, मुफ्ती आणि नेहरू-गांधी ही तीन घराणं आहेत. या तिन्ही घराण्यांनी इथे लोकशाही थांबवली होती. जर, २०१४ मध्ये मोदींचे सरकार आले नसते तर पंचायत, ब्लॉक आणि



जिल्हा निवडणुका झाल्या नसत्या, असे अमित शाह म्हणाले.

याचबरोबर, अमित शाह यांनीही जम्मू-काश्मीरमध्ये पसरलेल्या दहशतवादासाठी या तीन कुटुंबांना जबाबदार धरले. ते म्हणाले, ९० च्या दशकात फारुख यांच्या मेहरबानीमुळे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद आला. ९० च्या दशकात इथे मोठ्या प्रमाणात गोळीबार व्हायचा, कारण इथले सूत्रधार पाकिस्तानला घाबरत होते. पण आता पाकिस्तान नरेंद्र मोदींना घाबरत आहे. गोळीबार करण्याचे त्यांच्यात धाडस नाही. गोळीबार झाला तर गोळीबाराला गोळ्यांनी उत्तर दिले जाईल, असे अमित शाह म्हणाले. जम्मू-काश्मीरमधील लोकांना आरक्षण देण्याच्या मुद्द्यावर अमित शाह म्हणाले, मोदी आल्यानंतर ओबीसी, मागासवर्गीय, गुर्जर बकरवाल आणि पहाडींना आरक्षण मिळाले. मी विधेयक मांडले तेव्हा फारुख अब्दुल्ला यांच्या पक्षाने त्याला विरोध केला आणि येथील त्यांनी गुर्जर बंधूंना भडकावण्यास सुरुवात केली. मी राजौरीला आलो तेव्हा गुर्जर बांधवांचे आरक्षण कमी करणार नाही, असे वचन दिले होते. तर आम्ही गुर्जर, बकरवाल आणि पहाडींनाही बढतीत आरक्षण देण्याचे सांगत आहोत, असे अमित शाह यांनी सांगितले.

## पुणे विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम यांचं नाव देण्यात देणार; देवेंद्र फडणवीसांची पुण्यात मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१पुणे**

पुणे विमानतळाला जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचं नाव देण्यात येणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आज देवेंद्र फडणवीस हे पुणे पालखी मार्ग भूमीपूजन सोहळ्यात बोलत होते. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी यासंबंधी सरकारला प्रस्ताव दिला होता, तो आम्ही स्वीकारला आहे, येत्या कॅबिनेटमध्ये या प्रस्तावाला मंजुरी मिळेल अशी माहिती आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे.



जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचं नाव पुणे विमानतळाला देण्यात येणार आहे. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी नावासंदर्भातील प्रस्ताव सरकारला दिला होता, तो आम्ही स्वीकारला आहे, येत्या कॅबिनेटमध्ये या प्रस्तावाला मंजुरी मिळेल अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आज ते पुण्यात पालखी मार्ग भूमीपूजन सोहळ्यात बोलत होते.नवीन विमानतळ तयार करण्यात येणार आहे, त्याला छत्रपती संभाजी महाराजांचं नाव द्यायचं आहे. परंतु पुण्यात जे विमानतळ आहे, जे नव्या पद्धतीने बनवण्यात आलं आहे, त्याचं नामकरण जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या नावाने व्हावे, अशीसंकल्पना खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मांडली होती. त्यावर तात्काळ काम आम्ही सुरू केलंय. येत्या कॅबिनेटला आम्ही तो प्रस्ताव मांडून मंजूर करून घेणार आहोत. त्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवणार आहोत. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करून घेण्याची जबाबदारी मुरलीधर मोहोळ आणि नितीन गडकरी यांची असेल असंही फडणवीसांनी म्हटलं आहे. जगद्गुरू तुकाराम महाराजांचं नाव विमानतळाला दिलं, तर त्याचा सगळ्यांना आनंद होईल, असंही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

## बच्चू कडू यांचा संजय राऊतांवर शाब्दिक प्रहार

### संजय राऊत म्हणजे आकाशवाणी केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

विधानसभा निवडणुका अवघ्या काही दिवसांवर आल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधानसभेसाठी महाविकास आघाडी तसेच महायुतीकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरु असतानाच आता प्रहार’ संघटनेचे बच्चू कडू, ‘स्वाभिमानी शेतकरी’ संघटनेचे राजू शेट्टी तसेच ‘स्वराज्य’ संघटनेचे संभाजीराजे यांनी तिसऱ्या आघाडीचे आव्हान उभे केले आहे. संजय राऊतांना अभ्यास न करता वक्तव्य करण्याची सवय पडलेली आहे. जेव्हा देशात भाजप आणि काँग्रेस लढत होती तेव्हा शिवसेना तिसरीच होती ना? मग तेव्हा शिवसेना पैशासाठी लढत होती का असा सवाल



बच्चू कडू यांनी केला. महाराष्ट्राच्या सातबाऱ्यावर काय तुमचाच हक्क आहे का? लढण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे. आमच्या तिसऱ्या आघाडीचा फायदा भाजपला होईल कि काँग्रेसला होईल ते तुम्ही कस ठरवता? त्यामुळे अभ्यास न करता एखाद्या बावळट पोरासारखं बोलणं संजय राऊतांना शोभत नाही, त्यांनी जीभ सांभाळून बोलत राहावं असं म्हणत बच्चू कडू यांनी संजय राऊतांवर हल्लाबोल केला आहे.तसेच आगामी निवडणुकीत शिंदे-फडणवीस यांच्याविरोधात तगडे उमेदवार देणार, अशीही घोषणा आमदार बच्चू कडू यांनी केली आहे.काही दिवसांपूर्वीच तिसरी आघाडी ही नेहमी भाजपला मदत करते अशी टीका संजय राऊत यांनी केली होती. यावरुनच प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी जोरदार पलटवार केला आहे. संजय राऊत यांच्याकडे पुऱ्या महाराष्ट्राचा पीआर कार्ड नाही, संजय राऊत यांचा अभ्यास कमी आहे त्यांची जहागीरदार नाही असा घणाघात करत महाराष्ट्रात तिसरा पर्याय मजबुतीने देऊ, असे बच्चू कडू म्हणाले.

तसेच महाशक्तीचा राज्यात मुख्यमंत्री दिसेल असा मोठा दावा बच्चू कडू यांनी केला. आमची महाशक्ति पुऱ्या देशात आदर्श ठेल, देशभरात आदर्श वाटेल असे राज्य उभे करु असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात मजबूत उमेदवार देऊ व २८८ जागा पूर्ण लढवू, अशीही घोषणा बच्चू कडू यांनी केली.

**या देशामध्ये किमान अर्धेअधिक राज्य हे तिसऱ्या पार्टीजवळ**

संजय राऊत बोलताना एकतर अभ्यासपूर्ण बोलत नाहीत. फक्त ब्रेकिंग देण्याचा प्रयत्न करतात पण अभ्यास काहीच नसतो. तिसरी पार्टी दिल्लीला केजरीवाल यांची सक्सेस झाली,तिसरी पार्टी पंजाबला सक्सेस झाली, तिसरी पार्टी उत्तरप्रदेशमध्ये सक्सेस झाली. या देशामध्ये किमान अर्धेअधिक राज्य हे तिसऱ्या पार्टीजवळ आहे. हे काँग्रेसजवळही नाही आणि भाजपाजवळही नाही आहे. म्हणून संजय राऊत यांना अभ्यास करायला सांगा, त्यांचा अभ्यास कमी पडतोय. आम्ही लढू.आगामी काळात महाराष्ट्र राज्य तिसऱ्या पार्टीचं सरकार नक्की पाहिल आणि अतिशय उत्तम आम्ही चालवून दाखवू. असे बच्चू कडू म्हणाले.

## कापूस, सोयाबीनची खरेदी आता हमीभावापेक्षा अधिक दराने

### स्वत: उपमुख्यमंत्र्यांकडून पंतप्रधानांच्या साक्षीने दिला शब्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ वर्धा**

सोयाबीन, कापसाची हमीभावात खरेदी व्हावी. अधिक दर मिळावा यासाठी आयात होणाऱ्या कच्च्या तेलावरील ड्युटी वाढवा, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेऊन त्यांनी शेतकरी हितासाठी तात्काळ निर्णय घेतला.त्याचे परिणामही, दिसू लागले आहेत. सोयाबीनचे दर वाढले आहेत. या हंगामात हमीभावापेक्षा अधिक दराने सोयाबीन आणि कापसाची खरेदी होईल, असे वचन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या साक्षीने राज्यातील शेतकऱ्यांना दिले.



पंतप्रधान विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त वर्ध्याच्या स्वावलंबी मैदानावर शुक्रवारी विशेष कार्यक्रम झाला. यात अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आपली वचनबद्धता स्पष्ट केली. राज्यात महायुतीचे सरकार असून आमच्या सरकारने मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे फडणवीस यांनी जाहीररित्या सांगितले. जे काही निर्णय घेतले आहे ते आम्ही पूर्ण केले आहे.फडणवीस म्हणाले, वर्ध्यातील या कार्यक्रमाच्या माध्यमातून पीएम मित्रा पार्कचे भूमिपूजन, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनांचा शुभारंभ आणि पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दोन लाख लोकांना मदत मिळत आहे. या एकूणच योजनांचा विचार करता या कार्यक्रमाच्या माध्यमातून साडेसहा लाख कुटुंबांचे चित्र बदलणार आहे. त्यांच्यापर्यंत रोजगार आणि अधिकार पोहचणार आहे. जीवनात परिवर्तनाची आस असलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संधी निर्माण केली आहे. राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर लाडक्या बहिणींना आम्ही दीड हजार रुपये महिन्याला देत आहोत. यासोबतच लखपती दीदीही तयार करीत असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधानांना लक्षात आणून दिले.

## अदलाबदली होणारच! महाविकास आघाडीची २८८ जागांवर पहिल्या टप्प्यातली चर्चा पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**


महाविकास आघाडीची २८८ जागांवर पहिल्या टप्प्याची चर्चा पूर्ण झालीय. तिढा असलेल्या जागांवर आता दुसऱ्या टप्यात चर्चा होईल. तिढा असलेल्या जागांबाबत वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यासाठी तीनही पक्षांकडून एकत्र सर्व्हे केला जाईल. ३० ते ३५ जागांमध्ये दोन ते तीन पक्ष आग्रही असल्याने यातल्या जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेतल्या जातील. काही जागांमध्ये अदलाबदल केला जाणार आहेत. महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे.

महाविकास आघाडी लवकरच संयुक्त मेळावे आणि नेत्यांच्या दौऱ्यांच्या कार्यक्रमाचे नियोजन करून विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या रिंगणात उतरणार आहे. २०१९ ला जिंकलेल्या जागांमध्ये बहुतांश जागा या त्या पक्षालाच ठेवण्यावर चर्चा सकारात्मक झाल्याची माहिती आहे. काही जागांमध्ये अदलाबदल केला जाणार आहे. साधारणपणे ३० ते ३५ जागांमध्ये दोन किंवा तीन पक्ष आग्रही असल्याने यातील जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेणार आहे. महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे. भाजप-शिवसेना (शिंदे गट) सरकारचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपणार आहे. सध्या महाराष्ट्रात भाजप-शिंदे गटाचे सरकार आहे. त्याचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये निवडणुका होऊ शकतात. २०१९ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांवर निवडणुका झाल्या. १०६ आमदारांसह भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला होता.

## श्याम ते शमिभा... उच्चविद्याविभूषित शमिभा पाटील, वंचितच्या तृतीयपंथीय उमेदवार कोण?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले जात असून सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्येही जागावाटपाच्या चर्चा अंतिम टप्प्यात आल्या असून लवकरच जागावाटप घोषित होऊ शकते. दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून ७ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. आता, ॲड. प्रकाश आंबेडकर यांनीही विधानसभा निवडणुकांसाठी वंचितच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे वंचितकडून विधानसभा निवडणुकांसाठी प्रथमच तृतीयपंथी उमेदवाराला तिकीट देण्यात



आलंय. रावेर मतदारसंघातून शमिभा पाटील यांना तिकीट देण्यात आलं आहे. शमिभा या तृतीयपंथीय ( असून सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांची ओळख आहे.

## जरांगे पाटलांची ईडी चौकशी करा ; लक्ष्मण हाकेंची मागणी

### शंभर खोक्यांचा अपहार, बंद दाराआड चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१जालना**

राज्यामध्ये मराठा- ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चांगलाच तापला आहे. एकीकडे ओबीसीमधून आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील अंतरवाली येथे उपोषणाला बसले असतानाच या मागणीला विरोध करत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही उपोषण सुरु केले आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यामध्ये वातावरण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच आता मनोज जरांगेंची ईडी चौकशी करा, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी जरांगेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या तोंडी ओबीसींची भाषा कधी येत नाही, ओबीसींच्या प्रश्नावर आम्ही वास्तव प्रश्न विचारले होते. मुख्यमंत्र्यांना धनगरांच्या एसटी आरक्षणाबद्दल जीआर काढण्याचा अधिकार नाही, हा अधिकार संसदेचा आहे. मुख्यमंत्री घटनेशी द्रोह करत आहेत. मुख्यमंत्री तुम्ही म्हणता ओबीसी आरक्षण धक्का लागत



नाही जरांगे म्हणतात आम्ही आरक्षण घेतलंय, नक्की कोण खरं बोलत आहे, असा सवाल लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला.

उद्धव ठाकरेंसह जे आमच्या आरक्षणाबद्दल बोलले नाहीत, त्यांना आम्ही बॉयकॉट करणार आहोत. ओबीसी फक्त ओबीसींना मतदान करणार आहेत. जरांगे यांना रात्री पवार फॅमिली येऊन भेटते. ज्या देवेंद्र फडणवीस सारख्या माणसाने सारथीला निधी निर्माण करून दिला ते सगळी माणस आज देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने शिव्या घालतात. ओबीसींच्या बाजूने भूमिका न घेणाऱ्यांच्या सोबत कधीही सामील होणार नाही, आम्ही या निवडणुकीत पाडणार आहे सुरवात घनसांवगी पासून करणार आहे, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

**ईडी चौकशीची मागणी..**

आंदोलनामधून दहशत माजवण्याचं काम आणि ओबीसींवर दबाव टाकण्याचा काम सुरू आहे. जरांगे यांनी अभ्यास करावा. रात्री येऊन जर मंत्री भेटत असतील तर त्यांच काम काय आहे रात्रीच खेळ चाले. रात्रीत काय चालतं बंद दाराआड? शंभर खोक्यांचा अपहार झाल्याच त्यांनी मान्य केला आहे, राज्य सरकारने चौकशी केली पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारला विनंती आहे की जरांगे यांची ईडीमार्फत चौकशी झाली पाहिजे, असे म्हणत ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनीही जरांगेंवर गंभीर आरोप कले.

## संपादकीय ......

# सिंधूचे पाणी तापले

एकविसाव्या शतकात आणि त्यापुढे पाण्यावरून जगात संघर्ष निर्माण होतील, असा इशारा एक तपापूर्वीच जलतज्ज्ञांनी दिलेला होता. एकीकडे पाण्याचे साठे हे विशेषतः देशांच्या नैसर्गिक सीमा निश्चित करण्यास उपयुक्त ठरत असले, तरी नद्या किंवा तलावांचा सामायिक वापर करण्याकडे अनेक देशांचा कल असतो. एकटी नाईल नदीच सुमारे डझनभर देशांतून वाहते; मात्र एखाद्या देशाला पाणी मिळणार नसेल किंवा दोन देशांत पाण्यावरून भांडण झाले, तर जगात शांतता नांदणार नाही. २१ व्या शतकात गोड्या पाण्याचा पुरवठा आटत चालला असून, हवामान बदलांमुळे समुद्रपातळीत वाढ होत आहे. तसेच सीमारेषांमध्ये बदल होत आहेत. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे जगात नैसर्गिक साधनसंपत्तीची ओढाताण सुरू आहे. दक्षिण आशिया, उत्तर आफ्रिका आणि मध्यपूर्वेत पाण्यासाठी युद्ध होऊ शकते. आगामी काळात दक्षिण आशियात पाण्याच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना दहशतवाद्यांकडून लक्ष्य केले जाऊ शकते, असा इशारा अमेरिकेच्या 'सीआयए'ने पूर्वीच दिला आहे. तैग्रिस व युफ्रेटिस या नद्यांच्या पाण्याच्या वापरावरून तुर्कस्तान, सीरिया-इराणमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. मध्यपूर्वेत जॉर्डन नदीचे खोरे हे अनेक प्रदेशांसाठी पाण्याचा प्राथमिक स्रोत आहे. त्यात जॉर्डन, पॅलेस्टाईन आणि इस्रायल यासारख्या राजकीय तणाव असलेल्या प्रदेशांचाही समावेश आहे. इजिप्त आणि इथिओपियामध्ये गेल्या अनेक शतकांपासून नाईल नदीच्या पाण्यावरून वाद सुरू आहे. ही सुप्रसिद्ध नदी उगम पावते इथिओपियात; पण तिचा शेवट होतो इजिप्तमध्ये. २०१५ मध्ये इजिप्त आणि इथिओपियाने या नदीवर ग्रँड इथिओपियन रेनेसाँ धरण बांधण्यासाठी मतभेद बाजूला केले असून, हे धरण आफ्रिकेतील सर्वात मोठे आहे.

नदीच्या पाण्याचा निष्पक्षपाती वापर करण्याची हमी देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या एका करारावरही या देशाने स्वाक्षरी केली आहे. जोहोर धरणातील गोडे पाणी सशुल्क प्राप्त करण्यासाठी मलेशियाने सिंगापूरबरोबर ९० वर्षांचा करार केला आहे; पण ख्रिस्तपूर्व २००० पासून आजपर्यंत जगभरात पाण्याशी संबंधित डझनवारी संघर्ष झाले आहेत. या पार्श्वभूमीवर, भारत आणि पाकिस्तान संबंध तसे बिघडलेलेच आहेत. याचे कारण पाकिस्तानचा कुरापतखोर स्वभाव. पाकिस्तानने कित्येक दशके चीनशी मैत्री करून भारताला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. तो अर्थातच भारताने वेळोवेळी उधळून पाकिस्तानला इंगा दाखवला आहे. आता पाकिस्तानने बांगला देशात बेगम खालिदा झिया यांची बीएनपी किंवा बांगला देश नॅशनालिस्ट पार्टी, तसेच जमाते इस्लामी या कट्टरतावादी पक्षांना हाताशी धरून भारतविरोधी कारवाया वाढवल्या आहेत. शेख हसीना यांचे सरकार पाडून त्यांना देशातून पळवून लावल्यामुळे पाकिस्तानला परमानंद झाला आहे; पण म्हणून पाकिस्तानने काही आगळीक केल्यास भारत सडेतोड उत्तर देण्यास समर्थ आहे. आता सिंधू जलकराराबाबत फेरविचार करावा, अशी नोटीस भारताने पाकिस्तानला बजावली आहे. त्यामुळे उभय देशांत सिंधू नदी पाणीवाटपावरून नव्याने तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

भारत आणि पाकिस्तानने ९ वर्षांच्या वाटाघाटीनंतर १९ सप्टेंबर, १९६० रोजी आंतरदेशीय जलवाहतूक करारावर स्वाक्षरी केली. हा करार दोन्ही देशांमधील नदीच्या पाणीवाटपाबाबत आहे; पण ६४ वर्षांत बरेच काही बदलले आहे. म्हणूनच परिस्थितीतील मूलभूत आणि अनपेक्षित बदलांसाठी या कराराचे पुनर्मूल्यांकन आवश्यक आहे, असे भारताचे मत आहे. कराराच्या कलम १२((३) अंतर्गत, दोन सरकारांमधील वाटाघाटींद्वारे वेळोवेळी त्याच्या तरतुदींमध्ये सुधारणा केल्या जाऊ शकतात. किशनगंगा आणि रतले जलविद्युत प्रकल्पांसंदर्भात भारताने सिंधू जल कराराच्या पुनरावलोकन आणि दुरुस्तीची मागणी केली आहे. कराराच्या विविध कलमांतर्गत दायित्वांचे पुनर्मूल्यांकन गरजेचे आहेच, शिवाय सीमेपलीकडील दहशतवादाच्या प्रभावाचाही उल्लेख भारताने नोटिशीत केला आहे. भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष आयूब खान यांच्यात रावी, बियास आणि सतलज या नद्यांच्या पाण्यावर या सिंधू जल करार झाला होता. या नद्यांच्या पाण्यावर भारताचे नियंत्रण असेल, तसेच सिंधू, चिनाब आणि झेलम या नद्यांच्या पाण्यावर पाकिस्तानचे नियंत्रण असेल, असे कलम या करारात ठेवले होते; पण भारताची लोकसंख्या वाढत आहे. शेती करण्यासाठी अनेक नवीन पद्धतींचा वापर केला जातो. या पाण्याचा वापर वीजनिर्मितीसाठीही केला पाहिजे. म्हणजेच परिस्थिती बदलली असून, याचा विचार केला जावा, असा आपला सार्थ युक्तिवाद आहे. शिवाय पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांमुळे सिंधू नदी जल कराराच्या सुरळीत कामकाजात अडथळा येत आहे, याचीही गंभीर दखल पाकिस्तानने घेतली पाहिजे.या पश्चिमेकडील नद्यांचे पाणी नैसर्गिकरीत्या भारताने वाहू द्यावे आणि त्याचवेळी या नद्यांचे पाणी 'नॉन कन्झम्प्टिव्ह' कारणांसाठी भारतात वापरता येईल, अशी तरतूद मूळ करारात आहे. म्हणजेच हे पाणी प्रकल्पांसाठीही वापरता येईल; पण भारताने किशनगंगा, झेलम तसेच रतले प्रकल्पांसाठी हे पाणी वापरण्यास आक्षेप घेतला आहे. या प्रकल्पांच्या उभारणीबाबतच पाकिस्तानने हरकत घेतली आहे. आंतरराष्ट्रीय लवादाने किशनगंगा वगैरे प्रकल्पांना हिरवा कंदील दाखवला आहे; पण पाकिस्तान याबाबत भारताशी चर्चाही करायला तयार नाही. निदान जागतिक बँकेच्या लवाद यंत्रणेमार्फत हा प्रश्न सोडवता आला असता. २०१५ मध्ये या लवादास पाकिस्तानने मान्यता दिली; पण नंतर त्यांनी त्यापासून अचानकपणे माघार घेतली. भारताने हवामान बदलाचे आव्हान स्वीकारून नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला आहे. ८५० मेगावॅट क्षमतेचा रतले जलविद्युत प्रकल्प हा त्या हेतूनेच उभारण्यात येत आहे. स्वच्छ ऊर्जा ही काळाची गरज आहे. आगामी लोकसंख्येची अर्थव्यवस्थेची तसेच पर्यावरणीय आव्हाने काय आहेत, त्याचा विचार करून भारत निर्धाराने पावले टाकत आहे; पण पाकिस्तानला सर्वांच्या हिताचा दीर्घकालीन विचार करण्याची सवय नाही. त्यामुळे आपण स्वतःच खड्डयात जात आहोत, याचीही पाकिस्तानला पर्वा नाही!

# जिल्हा बँकेच्या उपविधीतील दुरूस्तीवर १ ऑक्टोबरला सुनावणी

## विभागीय सहनिबधकांना फेरनिर्णयाच्या सहकारमंत्र्यांच्या सुचना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ अमरावती:** जिल्हा मध्यवर्ती बँकेने उपविधीत केलेल्या सर्व दुरूस्त्या सहकारमंत्र्यांनी रद्द करीत विभागीय सहनिबधकांनी याची गूणवत्तेवर पडताळणी करून फेरनिर्णय देण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे उपविधीतील दुरूस्तीकरीता आता दोन्ही गटांना बोलावुन त्यांचे म्हणणे ऐकण्याकरीता ९ ऑक्टोंबर रोजी सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यामुळे विभागीय सहनिबंधकांच्या फेरनिर्णयावर-कडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्य सत्ताधाऱ्यांनी बबलु देशमुख गटाच्या १३ संचालकांना विश्वासात न घेता बँकेच्या उपविधीत मोठ्या प्रमाणात दुरूस्त्या करण्यात आल्या आहे.त्यामुळे या विरोधात १ ३ संचालकांनी सुरूवातीला विभागीय सहनिबंधकांकडे तक्रारी केली. परंतु त्यांची तक्रार फेटाळत उपविधीतील दुरूस्तीला मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर विरोधकांनी सहकार मत्र्यांकडे धाव घेतली. सहकार मंत्र्यांनी विरोधकांना दिलासा देत सर्व दुरूस्त्या रद्द केल्या तसेच याची पडताळणी करून यावर फेरसुनावणीचे विभागीय सहनिबंधकांना दिले होते.सत्ताधाऱ्यांनी मात्र सहकार मंत्र्यांच्या या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान सत्ताधारी गटाचे म्हणने विचारात न घेतल्याचा संदर्भ देत सहकार मंत्र्यांचे आदेश रद्द केले होते. सोबतच या सहकामत्र्यांनीच यावर फेर आदेश काढण्याबाबत निर्णय दिला. सहकार मंत्र्यांनी मात्र यावर सुनावणी घेत त्यांचापुर्वीचाच निर्णय पुन्हा करीत उपविधीतील सर्व दुरूस्त्या रद्द केल्या व विभागीय सहनिबंधकांना आदेश देत यावर सुनावणी घेवुन फेरनिर्णयाच्या सुचना ३ सप्टेंबरच्या पत्रान्वे काढले. त्यामुळे बबलु देशमुख गटाचे संचालक हरीभाऊ मोहोड यांनी तातडीने सुनावणी घेण्याबाबत विभागीय सहनिबंधकांना पत्र दिले. अखेर विभागीय सहनिबधकांनी उपविधीतील दुरूस्तीवर येत्या ९ ऑक्टोबर रोजी सुनावणीलावण्यात आली आहे. सहकारमंत्र्यांचा निर्णय विभागीय सहनिबंधक कायम ठेवण्याचे संकेत आहे. परंतु २८ सप्टेंबरच्या सर्वसाधारण सभेत नविन दुरूस्त्या करीत विरोधकांना पुन्हा न्यायालयीन प्रक्रियेत गुंतवून ठेवण्याचा सत्ताधाऱ्यांचा मनसुबा असल्याची देखील शक्यता नाकारता येत नाही.




# ॲलर्जी डोळ्यांची

डोळ्यांच्या ॲलर्जीचे प्रमुख लक्षणे आहेत डोळ्यांतील सूज आणि खाज. त्याशिवाय पापणीची कातडी काळी पडते, कातडीवर छोट्या सुरकुत्या येतात आणि कातडी कोरडी वाटते. बऱ्याचदा डोळ्यांना उजेड सहन होत नाही आणि उजेडामुळे डोळे आपोआप बंद होतात. लहान मुलांनाही ॲलर्जीचे विविध त्रास होतात अशा वेळी डोळ्यांची निगा कशी राखायची याविषयी...



अनेक कारणांमुळे ॲलर्जीचे प्रमाण वाढत आहे. त्यातील प्रमुख कारण आहे प्रदूषण, काँक्रिटीकरण आणि रोजच्या जीवनातील केमिकलचा जास्त वापर. ॲलर्जी कोणत्याही वयात होऊ शकते, पण जास्त प्रमाणात छोट्या मुलांमध्ये होते. कारण लहान मुलांमध्ये शरीराचा विकास पूर्णपणे झालेला नसतो. जसजसे वय वाढते, डोळ्यांमधील शक्ती वाढते आणि डोळ्यांत ॲलर्जीचे प्रमाण कमी होते.

लहान मुलांमध्ये होणारी ॲलर्जी :

लहान मुलांमध्ये होणारी ॲलर्जी जास्त प्रमाणात 'वर्नल' प्रकारची असते. मुलांमध्ये डोळ्याला खाज येण्याचे प्रमाण खूपच जास्त असते आणि मुले डोळ्याला जोरजोरात चोळतात. डोळ्यांतल्या बुब्बुळाजवळ छोटे फोड येतात. डोळ्यांचा रंग मातीसारखा होतो. लाली येते आणि डोळे उघडायला त्रास होतो. एरवी डोळ्यांच्या नजरेवर काही दुष्परिणाम होत नाही; पण कधीतरी नंबर येऊ शकतो आणि डोळ्यांत जखमसुद्धा होऊ शकते. योग्य उपचार करणे आवश्यक आहे. पण चांगली गोष्ट अशी, की ॲलर्जी मुलांमध्ये १२-१३ वर्षापर्यंत आपोआप कमी होते.

ॲलर्जीवर उपचार :

ॲलर्जीचे मूळ कारण म्हणजे डोळ्यांत असलेल्या वेगवेगळ्या केमिकलच्या संग्रहाचे प्रमाण. हा केमिकल संग्रह कमी झाल्यामुळे राज्याच्या काही भागात खरीप हंगामातील कांदा लागवडीला सुरवात झाली आहे. काही भागात लागवड आठ दहा दिवस होत आले आहेत.. त्यामुळे कांदा लागवडीची लगबग सुरु असल्याचे चित्र आहे. अशात कांदा लागवडीनंतर नवीन पात निघण्यासाठी किंवा कांदा चांगला राहण्यासाठी काय उपाय योजना करता लागतील, ते पाहुयात... ॲलर्जीचे प्रमाण वाढते. औषध उपचाराने केमिकलचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न करून ॲलर्जीची लक्षणे कमी होतात. डोळे थंड ठेवल्यावर खाज कमी होते. बऱ्याचदा स्टेरॉईडयुक्त औषधाचा वापर केला जातो. त्याशिवाय ओलोपाटिडीन आणि इतर औषधांमुळे केमिकलचे प्रमाण कमी करून ॲलर्जीची लक्षणे कमी होतात. स्टीरॉयडच्या अनियमित वापरामुळे डोळ्यांत काचबिंदू आणि मोतिबिंद होऊ शकतो. सवव डोळ्यांच्या ॲलर्जीसाठी नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# कीड नियंत्रणासाठी स्वस्त आणि सोपे जैविक औषध कसे बनवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

दशपर्णी अर्कास सेंद्रीय शेतीत खुप महत्वाचे स्थान आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो.

दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो. सेंद्रीय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकी दशपर्णी अर्क हा अत्यंत महत्वाचा बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क तयार केला जातो.

**दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर-** कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

**इतर साहित्य-** - पाणी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमुत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसून ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा.

कृषी विशेष

- एखादं दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालु शकतो.

- शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये.

- गोमुत्र जितके जूने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

- दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा.

- दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.




**दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत-** - करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला महत्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानूसार घेणे सर्व मिळुन १० वनस्पती होणे गरजेचे आहे.

वरील सर्व वनस्पती बारीक वाटून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसून ठेचा, देशी गायीचे शेण व गोमुत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे.

- दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने घडाळाच्या काट्याप्रमाणे ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकुन ठेवावे.

- असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे.

**दशपर्णी अर्काचा वापर**

- दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्यांपर्यंत वापरता येतो व बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवावा.

- हा तयार झालेला अर्क किड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्याला २०० मिली फवारणीसाठी वापर करावा.

**- फवारणी शक्यतो सकाळी** किंवा सायंकाळी करावी.

अर्कापासून नियंत्रित होणाऱ्या किडी

तुडतुडे, मावा, फुलकिडे, पहिल्या २ अवस्थेतील अळया यांच्यावर प्रभावी काम करते याची फवारणी शक्यतो दर ८ दिवसाला करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे

- मित्र किडीचे संवर्धन होवून नैसर्गिक पद्धतीने किड नियंत्रण होण्यास वाव मिळतो.

- उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात.

- रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहात नाहीत.

- अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मुलन होते.

- पर्यावरणपुरक किड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादीत होतो व शेती मालास सेंद्रीय म्हणून उत्तम दरही मिळतो.

# कांदा लागवडीनंतर नवीन पात निघण्यासाठी, कांदा चांगला राहण्यासाठी काय कराल ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

राज्याच्या काही भागात खरीप हंगामातील कांदा लागवडीला सुरवात झाली आहे. काही भागात लागवड आठ दहा दिवस होत आले आहेत.. त्यामुळे कांदा लागवडीची लगबग सुरु असल्याचे चित्र आहे. अशात कांदा लागवडीनंतर नवीन पात निघण्यासाठी किंवा कांदा चांगला राहण्यासाठी काय उपाय योजना करता लागतील, ते पाहुयात...

कांदा लागवडीच्या आठ दिवसांनंतर...

दुसऱ्यांदा पाणी देताना जमिनीतून ह्युमिक ॲसिड द्यावे, जेणेकरून रोपांच्या मुळांची वाढ होईल.

त्यानंतर १९:१९ चा स्प्रे देण्यात यावा. याचे प्रमाण हे पाच ग्रॅम प्रति लिटर पाण्यात द्यावे.

यासोबत कीटकनाशक कराटे अर्धा एमएल, तसेच मायक्रोन्यूटन अर्धा ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

संकलन : राष्ट्रीय फलोत्पादन संशोधन व विकास फाउंडेशन, निफाड,




# २८ सप्टेंबरला विदर्भात नागपूर कराराची होळी; ६४ वर्षांत राज्यकर्त्यांकडून सतत उपेक्षा!

## विदर्भ राज्य आंदोलन समितीचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ नागपूर**

महाराष्ट्राची निर्मिती होऊन ६४ वर्षे झाली. मात्र, या कालावधीत सातत्याने विदर्भावर अन्यायच होत आहे. राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे विदर्भातील विकासाची वाट लागली आहे, त्याच्या निषेधार्थ येत्या २८ सप्टेंबरला विदर्भातील सर्व जिल्हा तसेच तालुकास्थळावर 'नागपूर कराराची' होळी करण्यात येणार असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आ. ड वामनराव चटप यांनी दिली.

विदर्भात बारमाही नद्या आहेत. विपुल खनिज आणि वनसंपदा आहे. कुशल मनुष्यबळ आहे. मात्र, एवढे सर्व असूनही विदर्भाचा विकास झालेला नाही. विदर्भातील सिंचनाचा प्रश्न, दिवसेंदिवस वाढणारी बेरोजगारी एकीकडे चिंतेचा विषय आहे. दुसरीकडे येथील कोळसा, वीज दुसऱ्या प्रदेशांत पाठविली जाते.



हवालदिल शेतकरी, त्याचे कुटुंबीय आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत. त्यामुळे सरकारला इशारा देण्यासाठी २८ सप्टेंबरला नागपूर कराराची होळी विदर्भ राज्य आंदोलन समिती करणार आहे. विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पदाधिकारी डॉ. श्रीनिवास खांदेवाले, रंजनाताई मामर्डे, अरुण केदार, मुकेश मासूरकर, प्रा. डॉ. पी. आर. राजपूत, नरेश निमजे, प्रशांत नखाते, गुलाबराव धांडे, अशोक धापोडकर, गंगाधर मुंडकर आदी यावेळी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# बुलढाणा आरएफओला मागितली २ लाखांची खंडणी

## मनसे विद्यार्थी सेनेच्या जिल्हाध्यक्षावर गुन्हा दाखल

### उपोषण करून करत होता ब्लॅकमेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ बुलढाणा**

बुलढाणा आरएफओ अभिजीत ठाकरे यांच्याविरुद्ध अमरावती येथील सीसीएफ कार्यालय समोर उपोषण करत २ लाखांची खंडणी मागणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षा विरुद्ध १९ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजेच्या सुमारास अमरावती येथील गाडगे नगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत मिळालेली माहिती अशी की,महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष शिवादादा पुरंदरे यांनी १९ सप्टेंबर पासून मुख्य वन संरक्षक अमरावती यांच्या कार्यालय समोर उपोषण सुरू केले होते.







त्यांना उपोषणापासून प्रावृत करण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशाने बुलढाणा आरएफओ अभिजीत ठाकरे इतर अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत उपोषण मंडपात पोहोचले परंतु उपोषणकर्त्याने माघार घेतली नाही, म्हणून आरएफओ ठाकरे यांनी शिवादादा पुरंदरे यांना म्हटले की आपण बाहेर कुठेतरी बसून शांततेत चर्चा करू आणि मार्ग काढू, त्यावर शिवादादा पुरंदरे यांनी होकार देत व्हाट्सअप कॉल करण्याचे सांगितले.आरएफओ ठाकरे हे अमरावती येथील रहिवासी असल्याने ते आपल्या घरी परतले आणि शिवादादा पुरंदरे यांना व्हाट्सअप कॉल केले असता पुरंदरे यांनी २ लाख रुपयांची त्यांना मागणी केली. यावर ठाकरे यांनी येण्या जाण्याचा तसेच पेंडॉल साठी २० हजार रुपये देण्यासाठी तयार झाले,पण पुरंदरे यांनी सहमती दर्शवली नाही. शिवादादा पुरंदरे यांनी माझी प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने व मला त्रास देण्याच्या उद्देशाने उपोषणास बसण्याचे नाटक करून माझ्याकडून २ लाख रुपयांची मागणी केली,अशी तक्रार आरएफओ अभिजीत ठाकरे यांनी दिल्याने महाराष्ट्र नव नवनिर्माण विद्यार्थी सेना बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शिवादादा पुरंदरे विरुद्ध अमरावती येथील गाडगे नगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसडीओ कार्यालयात शेतकऱ्याने घेतला विषाचा घोट

## भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्याने टोकाचे पाऊल



### कागदपत्रांचा अभाव होता

ईलेक्शन ड्युटीवर असलेल्या एका स्थानिक नायब तहसीलदारांचा अपघात झाल्यामुळे मी रुग्णालयात गेले होते. त्यामुळे सुनावणीला हजर राहू शकली नाही. मात्र, त्यांच्या प्रकरणात मूळ कागदपत्रांचा अजूनही अभाव आहे.

**–तेजश्री कोरे,** उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चांदुर रेल्वे–** येथील उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांच्या समक्ष त्यांच्या कार्यालयात विषारी द्रव्य प्राशन करून एका शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (दि. २०) दुपारी साडेतीन वाजता घडली. अनेक दिवसांपासून शेती अधिग्रहणाचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. दिलीप तुळशीराम ढगे (५२, रा. उजोना, ता. दारव्हा) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, दिलीप ढगे यांच्यासह एकूण १४ वारसांच्या नावावर नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सालोड येथील ६.७४ हेक्टर आर शेत जमीन चांदी नदी प्रकल्पाकरिता संपादित केली आहे. परंतु, या प्रकरणात आपसी विवादामुळे संबंधित भूधारकांना मोबदल्याची रक्कम देण्यात आली नव्हती. मात्र, सर्व व्यवस्थित झाल्यानंतर जमिनीच्या भूसंपादनाच्या मोबदल्याची रक्कम मिळण्यासाठी रामकृष्ण ढगे

वारंवार चकरा मारूनही समाधानकारक उत्तर नाही १६ ऑगस्टला उपविभागीय अधिकाऱ्यांनी आवश्यक दस्तावेजांसह शेतजमिनीशी संबंधितांना बोलावले होते. आम्ही सर्व एसडीओ कार्यालयात हजर होतो. अनेक दिवसांपासून शेती अधिग्रहणाचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. दिलीप तुळशीराम ढगे (५२, रा. उजोना, ता. दारव्हा) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. मात्र, एसडीओ कोरे कार्यालयात नसल्याने सुनावणी झाली नाही. त्यानंतरही दिलीप ढगे व इतरांनी सुनावणीच्या तारखेसाठी वारंवार एसडीओ कार्यालयात चकरा मारल्या. याप्रकरणी समाधानकारक उत्तर न मिळाल्याने दिलीप ढगे यांनी टोकाचे पाऊल उचलले, अशी माहिती दिलीप ढगे यांचे बंधू जगदीश ढगे यांनी दिली.

# अमरावतीच्या शिरपेच्यात मानाचा तुरा.......

## गुरुकुंज मोझरीच्या सुपुत्राचा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केला गौरव

### सीआरपीएफ असिस्टंट कमांडंट डॉ. चेतन शेलोटकर राष्ट्रीय नवोदय गौरव पुरस्कार २०२४ पुरस्काराने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ नवी दिल्ली –** लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरीचे सुपुत्र व सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडंट या पदावर कार्यरत असलेले डॉ. चेतन शेलोटकर राष्ट्रीय नवोदय गौरव पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले आहे. ह्या पुरस्काराने डॉ. शेलोटकर यांचा गौरव करण्यात आल्यामुळे अमरावतीच्या शिरपेच्या मानाचा तुरा रोवला आहे.

जानकीदेवी सभागृह प्रताप नगर, जयपूर राजस्थान येथे जगातील सर्वात मोठी माजी विद्यार्थी संस्था नवोदय फॅमिली वर्ल्डवाईड द्वारे कोअर कमिटी कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये जगभरात उत्कृष्ट, अभिमानास्पद कामगिरी आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या देशातील विविध नवोदय विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना राष्ट्रीय नवोदय गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय शिक्षा योजना १९८६ अंतर्गत देशातील प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालयाची स्थापना करण्यात आली. नवोदय विद्यालय ही देशातील सर्वात मोठी शाळा संस्था आहे. आतापर्यंत जवळपास सोळा लाख विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालय मधून शिक्षण घेतले आहे आणि त्यातील हजारो विद्यार्थी जगभरात विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत आणि नावलौकिक मिळवत आहेत.

एक तडफदार आणि कर्तव्यदक्ष तसेच संवेदनशील अधिकारी असताना 'आपणही या समाजाचं काही देणं लागतो ही भावना उराशी बाळगत शैक्षणिक आणि सुरक्षा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अमरावती जिल्ह्यातील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी गुरुकुंज मोझरीचे सुपुत्र व सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडंट या पदावर कार्यरत असलेले डॉ. चेतन शेलोटकर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.डॉ. चेतन शेलोटकर यांचे प्राथमिक शिक्षण श्रीगुरूदेव विद्यामंदिर गुरूकुंज आश्रम येथे पूर्ण झाले. वडील उदारामजी शेलोटकर सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहेत तसेच आई गृहिणी. डॉ. चेतन यांनी सहावीत असतानाच बुद्धी कौशल्याच्या जोरावर १९९६ मध्ये जवाहर नवोदय विद्यालय अमरावती येथे प्रवेश मिळवला. नवोदयमधूनच



विज्ञान शाखेत बारावी पूर्ण केली. तिथे त्यांना स्काऊट अँड गाईड्स मधील भारत सरकारचा राष्ट्रपती पुरस्कार तसेच नवोदय विद्यालय समितीचाराज्य पुरस्कार मिळाला आहे. ८ महाराष्ट्र बटालियन छउउ उशीींळषळलरींश-- परीक्षा उत्तीर्ण केली आणि बेसिक लीडरशिप कॅम्प, -ढउ मध्ये यशस्वी सहभाग घेतला. बारावीनंतर सावंगी मेघे, वर्धा येथील वैद्यकीय महाविद्यालयात त्यांनी फिजिओथेरपी या वैद्यकीय शाखेतील पदवी संपादन केली, त्यानंतर डॉक्टर होऊन अमरावतीत रुग्णसेवा केली. मात्र देश सेवेची ऊर्मी भरलेल्या डॉ. चेतन यांना आपल्या हातून हवी तशी सेवा घडत नसल्याचे मनोमन वाटत होते. त्यामुळे त्यांनी यूपीएससीच्या परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. त्या तयारीसाठी पुणे गाठले. यूपीएससीची तयारी केली आणि २०१३ मध्ये यूपीएससी 'सीएपीएफ' (सेंट्रल आर्म पोलिस फोर्स) परीक्षा दिली, या परीक्षेत गुणवत्ता यादीत देशातून १६३ वा येऊन त्यांची निवड सीआरपीएफमध्ये थेट 'असिस्टंट कमांडंट' (वर्ग-अ राजपत्रित) गृह मंत्रालय, भारत सरकार या पदावर झाली. डॉक्टर झालेला मुलगा आता एखादा दवाखाना थाटून चांगला पैसा कमावणार असे वाटले होते. मात्र डॉ. चेतन यांनी फोर्समध्ये जाण्याचा मार्ग निवडला व गुरूग्राम हरियाणा येथे जाऊन एक वर्षांचे अतिशय खडतर प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मध्यप्रदेशातील शिवपुरी येथे उख-ढ कोर्स पूर्ण केला. त्यानंतर त्यांची पहिलीच पोस्टिंग झारखंडमधील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात लातेहार येथे झाली. त्या ठिकाणी दोन वर्ष सेवा बजावली.

उत्तम प्रशासक व नेतृत्वगुण त्यामधून बाहेर आले. झारखंडमधील अतिसंवेदनशील अशा नक्षलग्रस्त भागात चोख कामगिरी बजावल्यामूळे पुलिस आंतरिक सुरक्षा सेवा मेडल ने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर भारतीय सैन्यात 'कॅप्टन' या पदी बारामुल्ला, जम्मू-काश्मीर येथे सहा महिने काम करण्याची त्यांना संधी मिळाली. तसेच कुपवाडा, अनंतनाग येथे कार्यरत होते. भारतीय सैन्यातील स्पेशल सर्व्हीस मेडल आणि हाय अल्टिट्युड मेडल ने सन्मानित आहेत. त्यांनी आझादी का अमृत महोत्सव' राष्ट्रीय एकता दिवस उठझऋ सायकल रॅलीचे नेतृत्व करून गडचिरोली महाराष्ट्र ते डींरींश षणपळीं केवडिया गुजरात ११०० किलोमीटर अंतर यशस्वीरीत्या पार केले.

राष्ट्रीय एकता दिवस परेड-२०२१ मध्ये उठझऋ सायकल टीमचे नेतृत्व करीत यशस्वी सहभाग घेतला. जम्मू येथे उठझऋ दिवस परेड-२०२२ मध्ये पश्चिम क्षेत्राचे नेतृत्व केले त्याकरीता डायरेक्टर जनरल उठझऋ तर्फे कमेंडेशन डिस्क आणि सर्टिफिकेट' ने पुरस्कृत आहेत.विविध सामाजिक विषयांवर लिखाणाची आवड असल्याकारणाने त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध आहेत. तसेच अनेक विद्यापीठ, शाळा-महाविद्यालयांत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, करियर कौन्सिलिंग आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर प्रेरणादायी भाषणे तसेच नक्षलवाद, आतंकवाद आणि भारताची आंतरिक सुरक्षा, विशेषतः अनेक सामाजिक विषयांवर त्यांची व्याख्याने आयोजित होत असतात. आपल्या ग्रामीण भागातील तरुणांमध्ये देशभक्ती आणि देशसेवेची भावना रुजवून त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्यास त्यांचा सदैव कयास असतो. तसेच ते फिजिओथेरेपिस्ट असल्याकारणाने फिजिकल फिटनेस कौन्सिलिंग करीत असतात. सध्या, डॉ. चेतन उठझऋ -लरवशू गुरूग्राम, नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत. 'राष्ट्रीय नवोदय गौरव पुरस्कार २०२४ मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

नवोदय फॅमिली वर्ल्डवाईड कोअर कमिटी कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये देशातील सर्व राज्यातून तसेच परदेशातील जवाहर नवोदय विद्यालयाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आपल्या भाषणात सांगितले की, उत्कृष्ट शिक्षण, चांगले संस्कार आणि शिस्त म्हणून नवोदय विद्यालयने देशात नावलौकिक मिळवला आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त त्यांनी तरुणांना विकसित भारताच्या राष्ट्रीय संकल्पात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

संस्थापक सीताराम नारनोलिया म्हणाले की, नवोदय परिवाराचे नेटवर्क भारतासह १४० देशांमध्ये आहे. राष्ट्रीय नवोदय गौरव पुरस्कार कार्यक्रमात विशेष पाहुणे म्हणून वडोदरा गुजरातचे खासदार डॉ. हेमांग जोशी हे स्वतः पोरबंदर नवोदयचे माझी विद्यार्थी आहेत, सत्या मायक्रो फायनान्सचे सीईओ विवेक तिवारी, आजतक वाहिनीचे प्रमुख शरद कुमार, ब्रिजपाल सिंह चरण, रिअल इस्टेट किंग पंकज रौसा, दिल्ली मेट्रोचे भारत भूषण, जीएसटी सहायक आयुक्त मुक्रम सिंह उपस्थित होते. देशभरातील ७५० हून अधिक नवोदय विद्यालयचे माजी विद्यार्थी. आणि अनेक कार्यरत ख-ड, खझड, खएड, ठ-ड, शिक्षणतज्ज्ञ, अभियंते, डॉक्टर, पत्रकार, उद्योगपती, राजकारणी इत्यादींसह विविध क्षेत्रात २००० माजी विद्यार्थी सहभागी झाले होते, जे आज विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत स्वतःचे नाव कमावत आहे. या कार्यक्रमात दिल्लीतील नवोदय अतिथीगृह आणि जयपूर नवोदय अतिथीगृहाचे उद्घाटन केले गेले. सोहळा अगदी भव्य आणि दिमाखात साजरा करण्यात आला.

# शेतकरी संघर्ष समितीची जिल्हाधिकाऱ्याकडे धाव

## बाजार समितीची आमसभा रद्द करा–शेखर औगड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी सदस्य व आमंत्रित केलेल्या सेवा सहकारी संस्था व ग्रामपंचायत सदस्यांची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) २८ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टीएमसी यार्ड येथे आयोजित केली असून ही सभा रद्द करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेशी शेतकरी सदस्य संबंधित आहेत. जिल्हा बँक व कृषी उत्पन्न बाजार समितीची आमसभा एकाच दिवशी २८ सप्टेंबरला बोलाविण्यात आलेली आहे. नियमाने दोन्ही आमसभा एकाच दिवशी बोलाविता येत नाही. शेतकरी प्रतिनिधीनी बाजार समितीच्या सभेला हजर रहावे की बँकेच्या सभेला सभेला उपस्थित रहावे, असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. यावरून शेतकरी संभ्रमात व चिंतेत आहे.

शेतकरी हा प्रतिनिधी म्हणून जिल्हा बँकेशी व बाजार समितीशी संबंधित असून तो केवळ एकाच ठिकाणी उपस्थित राहू शकेल. बाजार समितीपेक्षा शेतकऱ्यास आर्थिक मदत करणारी शेतकऱ्याची एकमेव बँक म्हणजे जिल्हा मध्यवर्ती बँक सभेकारिता अधिक प्रमाणात शेतकरी वर्ग



उपस्थित राहून आपला हक्क बजावतात. त्याचप्रमाणे बाजार समितीच्या अडचणी मांडण्याकरीता त्या सभेलासुद्धा शेतकरी अधिक उपस्थित असतो. असे असताना प्रशासनाने हेतूपुरस्परपणे दोन्ही संस्थेचा आमसभा एकाच दिवशी एकाचवेळी संधी साधून बोलाविलेल्या आहेत. बाजार समितीने सभेसाठी गणपूर्ती (कोरम) पूर्ण न होण्याचे हेतूने सभेचे आयोजन केल्याचे शेतकरी वर्गात बोलले जात असून त्यांच्यातून नाराजीचा सूर निघत आहे. ही बाब लक्षात घेताशेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी तसेच शेतकरी नेते प्रकाश साबळे यांचे नेतृत्वात समिती सचिव शेखर औगड. उमेश महिंगे, मंगेश इंगोले, राहुल तायडे, योगेश देशमुख यांनी थेट जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. शेतकरी वर्ग दोन्ही सभेला उपस्थित राहील या उद्देशाने बाजार समितीची सभा रद्द करून ती सुटीच्या पुढील दिवशी निश्चित करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.२८ तारखेची सभा रद्द करून पुढील तारीख घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यावेळी सेवा सहकारी संस्था अध्यक्ष, पदाधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच उमेश महिंगे. शेखर औगड, योगेश देशमुख, अमित कुचे, राहुल तायडे, समीर जवजाळ, पुष्कर निमकर, अमर तेलखडे, मंगेश इंगोले, रुपेश कळस्कर, संजय लव्हाळे, मंगेश देशमुख, उमेश वानखडे, आदी उपस्थित होते.

### गरज पडल्यास आंदोलन करू

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत अनेक गैरप्रकार, नियमबाह्य कार्य होत आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारी पडून आहेत. सर्वसाधारण सभा मोठ्या प्रमाणात गाजणार असल्याचे पाहता बाजार समिती प्रशासनाने कोरमपूर्ती कमी होण्याच्या हेतूने ही सभा बँकेची आमसभा असलेल्या दिवशी ठेवली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी बाजार समितीची सभा रद्द करण्याचे आश्वासन दिले असून पुढील तारीख शेतकरी बांधवांना कळविण्यात येणार आहे. शेतकरी सभासदांनी बाजार समितीच्या सभेकरिता बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी संघर्ष समितीद्वारे शेखर औगड यांनी केले.

# प्रसादाच्या लाडूत चरबीचे तेल मिसळणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करा

## – सुनील घनवट, मंदिर महासंघ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मुंबई** जगभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूमध्ये प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जात असल्याची अत्यंत गंभीर बाब आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी उघड केल्यावर जगभरातील हिंदू समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. प्रसादामध्ये प्राण्यांच्या चरबीचे तेल मिसळणे, ही केवळ भेसळ नसून हिंदूंच्या धर्मश्रद्धेवर जाणीवपूर्वक केलेला धार्मिक आघात आहे. हा प्रकार म्हणजे हिंदूंशी केलेला विश्वासघातच आहे. माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांचे वडील सॅम्युअल राजशेखर रेड्डी हे मुख्यमंत्री असतांना श्री तिरुपती बालाजी मंदिराचे पवित्र लाडू बनवण्याचे कंत्राट एका ख्रिस्ती आस्थापनाला देण्यात आले होते, मंदिराच्या विश्वस्तपदी ख्रिस्ती व्यक्तींना नेमले गेले होते, मंदिर परिसरात ख्रिस्ती मिशनर्यांच्या धर्मांतराला प्रोत्साहन दिले गेले आदी अनेक पापे त्या काळात करण्यात आली. त्याचाच पुढचा भाग म्हणजे या प्रसादाच्या लाडूत चरबीचे तेल मिसळून हिंदूंना धर्मभ्रष्ट करण्याचे षड्यंत्र रचले गेले,असे प्रतिपादन मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी केले.

ज्यांनी हे महापाप केले आहे, त्यांच्यावर धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी गुन्हे दाखल करून त्यांना तत्काळ अटक करावी, अशी मागणीही श्री. घनवट यांनी केली. याविषयी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने मुंबई येथील दादर (पू.) रेल्वे स्थानकाजवळ आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मंदिर महासंघाचे सदस्यांसह, भाविक आणि हिंदुत्वनिष्ठ उपस्थित होते.

आता केवळ या प्रसादाच्या लाडूच्या प्रकरणाचीच नव्हे, तर जगनमोहन रेड्डी सरकार आणि त्यांचे वडील सॅम्युअल राजशेखर रेड्डी यांच्या कार्यकाळात तिरुपति मंदिराशी निगडीत घेतलेल्या सर्वच निर्णयांची सखोल चौकशी करण्यात यावी. त्यातील जे हिंदु धर्मविरोधी निर्णय घेतले असतील, ते सर्व तात्काळ रहित करण्यात यावेत, अशी मागणी 'मंदिर महासंघा'ने आंध प्रदेश सरकारकडे केली आहे.हे प्रकरण म्हणजे मंदिर सरकारीकरणाचा सर्वांत मोठा दुष्परिणाम म्हणता येईल. देशभरातील सर्वच मंदिरांमध्ये अशा प्रकारे धर्मभ्रष्टता वा हिंदु धर्मविरोधी कृती तर होत नाहीत ना, याची तपासणी करण्याची वेळ आली आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये कावड यात्रेत सहभागी भक्त ज्या हॉटेल वा धाब्यावर थांबत होते, त्यांच्या जेवणामध्ये थुंकणे, लघुशंका करणे आदी विकृती समोर आल्या होत्या. तसेच अनेक मंदिरांच्या बाहेर देवाला अर्पण करण्यात येणारी फुले आणि हार यांनाही थुंकी लावण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

केवळ 'थूंक जिहाद'च नव्हे, तर सध्या मुंबईतील श्री सिद्धीविनायक मंदिरापांसून केरळमधील अनेक मंदिरांमधील देवाचा प्रसाद हा 'हलाल उत्पादनां'पासून बनवण्याचा प्रकार समोर आला. धर्मपरायण हिंदू कदापि हे सहन करू शकत नाहीत. भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला धर्माचरणाचे स्वातंत्र्य दिलेले असतांना त्यात अशा प्रकारे बाधा आणणे, हा गंभीर अपराध आहे. हिंदूंच्या धार्मिक अधिकारांचे रक्षण करणे, हे सरकारचे दायित्व आहे. मंदिरांमध्ये देण्यात येणारा प्रसाद हा सात्त्विक, शुद्ध, पवित्र तर असावाच, मात्र तो बनवण्यापासून वितरण व्यवस्थेतील प्रत्येक जणही धर्मपरायण हिंदु असावा, अशी मागणी करण्याची वेळ आज आली आहे.

यासाठी हिंदु समाजाने उठाव करून आपली मंदिर संस्कृती भ्रष्ट होण्यापासून वाचवायला हवी, असेही घनवट यांनी म्हटले आहे.

# देशातील विश्वकर्मांना अर्थबळ; विविध राज्यांतील अठरा लाभार्थ्यांना धनादेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१वर्धा :** बारा बलुतेदार हे भारताच्या समृद्धीचा मजबूत पाया होते. मात्र, त्यांची काँग्रेस राजवटीत थट्टा करण्यात आली. त्यामुळे विश्वकर्मा समाज उपेक्षित राहिला. आता मात्र आम्ही दखल घेतली असून त्यांचा सर्वांगीण विकास हाच आमचा अजेंडा आहे. कारागिराने केवळ एवढ्यावरच थांबू नये तर तो उद्योजक व्हावा, तरच धातूविज्ञान, वस्त्रनिर्माण जगात सर्वोत्तम ठरेल. म्हणूनच आज देशभरातील विश्वकर्मांचा हा सन्मान केला जात असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेतील लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुरू केलेल्या पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा स्वावलंबी शाळेच्या मैदानावर शुक्रवारी पार पडला. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात देशभरातील १८ विश्वकर्मांना कर्जमंजुरीचे धनादेश वितरित करण्यात आले. यामध्ये उत्तरखंडमधील जैबून निशा या पहिल्या लाभार्थी ठरल्या. देशातील १ लाख लाभार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने ओळखपत्र व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच १ लाख विश्वकर्मांना डिजिटल प्रमाणपत्रही ऑनलाइनरीत्या वितरित करण्यात आले.



### ७५ हजार लाभार्थ्यांना १४०० कोटींचे कर्ज

देशातील ७५ हजार लाभार्थ्यांना १४०० कोटींचे विनागॅरंटी कर्ज मंजूर करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्रातून कीर्ती संतोषराव रावेकर (टेलर्स, वर्धा) यांच्यासह जैंबुन निशा (गारलँड मेकर, उत्तराखंड), सिंटू कुमार (बिहार, डॉल व टॉय मेकर), अखिरिली किरहा (सुतार, नागालँड), रामनाथसिंग गुजर (मूर्तिकार, मध्य प्रदेश), सतीश के. सी. (सोनार, केरळ), सुदिप्ता दास (मत्सजाळे कारागीर, ओडिशा) यांच्यासह विविध राज्यांतील १८ जणांना कर्जमंजुरीच्या धनादेशांचे वितरण करण्यात आले.

### 'साडेसहा लाख कुटुंबांचे चित्र पालटणार'

एकाच कार्यक्रमातून साडेसहा लाख कुटुंबांना रोजगारांची संधी उपलब्ध होणार असून त्यांचे चित्र पालटणार आहे. अमरावतीच्या पीएम मित्र टेक्सटाईल पार्कमुळे भारताचे नाव विश्वाच्या नकाशावर येणार. देशातील ७ टेक्सटाईल पार्कमध्ये अमरावतीचा समावेश असल्याने ही महाराष्ट्राकरिता मोठी उपलब्धी आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

# राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीला सुरुवात

## प्रीती बंड, यांनी कॅमेऱ्याचे बटन क्लिक करून केले उद्घाटन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**
अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन च्या वतीनेआयोजित राज्यस्तरी छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनी ही छायाचित्र स्पर्धा प्रदर्शनी तीन दिवस सांस्कृतिक भवन येथील हॉलमध्ये सर्वांसाठी विनामूल्य राहणार आहे आज दिनांक २० रोजी छायाचित्र स्पर्धेचे उद्घाटन कॅमेराचे बटन क्लिक करून प्रीती बंड, यांनी केलेयावेळी उपस्थितांनी कॅमेऱ्याचे बटन क्लिक केले,कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेखा ठाकरे या होत्या प्रमुख उपस्थिती हेमंत देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, अरविंद गावंडे , पप्पू पाटील,माजी महापौर किरण महल्ले, प्रीती बंड , राजेश वाडेकर, आकाश लादे, प्रकल्प प्रमुख निलश्याम चौधरी, व्यासपीठावर उपस्थित होते,यावेळी विशेष उपस्थिती सागर बनकर, भारती बनकर. संचालक, सागर लँड डेव्हलपर्स अँड बिल्डर्स अमरावती,प्रा मनीष भंकाळे, प्रा. मनीषाताई देशमुख, वाणी सर, बंधन लॅब चे संचालक नागपूर ,प्रतिक टेकाडे, संचालक जय भवानी मल्टी सर्विसेस, आयुष प्रजापति, क्लिककर विंग स्टोअर संचालक अमरावती, प्रशांत जैन, संचालक सिल्क लॅब नागपूर ,यावेळी मोठ्या संख्येने अंबा नगरी फोटोग्राफर व्हिडिओ ग्राफर असोशियन बंधू-भगिनी तसेच श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय येथील जनसंवाद विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी अंबा नगरी फोटो व्हिडिओग्राफर असोसिएशन चे माजी अध्यक्ष, सन्माननीय सदस्य, अनिल सातपुते, अनिल पडिया, विजय देवाने ,मनीष जगताप, दिलीप जिरापुरे, राहुल पवार , माजी सदस्य, रामेश्वर गुल्हाने ,अरविंद भूगोल, प्रवीण काळे, नरेश जीरापुरे , तथा सदस्य गजानन आंबेडकर, राहुल पालेकर ,प्रतिक रोहनकर अजिंक्य सातपुते, संजय साहू, नितेश जझा, हेमंत श्रीवास्तव, पंकज पाचपोर, सागर काजळे, रोशन अग्रवाल, सोहेल अहमद, विनय तिवारी, अशोक ढोका, प्रा रुपेश फसाटे, संदीप पाटील, महेंद्र मोहोड शिवा देशमुख, मंगेश घाटोळ, अनंत जामोदकर, मोहन कोहळे, शुभम डोईफोडे, प्रशांत गजबे, अमित खैरकर, मयूर कासार, रोशन खैरे, अब्दुल मोहसीन,पुष्पक राऊत, संजय वाडकर, छायाताई काळमेघ, संदीप नाईक, अक्षय डोईफोडे,व यावेळी कार्यक्रमाचे, सूत्रसंचालन श्रीकृष्ण पखाले,व, आभार प्रदर्शन माजी अध्यक्ष अनिल जी पडीया यांनी केले-

# कलावंतांचे टाळ मृदंग आंदोलन:आर्थिक विकास मंडळ गठीत करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१यवतमाळ –** यवतमाळ कलावंतांसाठी आर्थिक विकास महामंडळ गठीत करावे यासह विविध मागण्यांसाठी शुक्रवारी दि. २० सप्टेंबर रोजी अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीने टाळ मृदंगांच्या गजरात आंदोलन केले. दरम्यान समितीच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले. शासनाने कलावंताच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कलावंत आर्थिक विकास मंडळ गठीत करावे, वृद्ध कलावंताचे तिन वर्षापासून दाखल केलेले मानधन प्रस्ताव अद्याप प्रलंबित पडून आहेत. ते मंजुर करावे, कलावंतानां राज्यात एसटी बस सेवा प्रवासात सवलत द्यावी, युवा कलावंताना प्रशिक्षणासाठी पाच हजार रूपये आर्थिक सहाय्य करावे, बेघर कलावंतांना विशेष प्राधान्य देवून घरकुल मंजुर करावे यासह आदी मागण्यांसाठी अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीने टाळ मृदंगांच्या गजारात आंदोलन केले. दरम्यान या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी ड. शाम खंडारे, सिद्धार्थ भवरे, अशोक उमरतकर, रमेश वाघमारे, अविनाश बन्सोड आदी सहभागी झाले होते.

# राजकारण असा धंदा ज्यात शिव्या खायची तयारी ठेवावी लागते –देवेंद्र फडणवीस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,२१ नागपूर–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राजकारणाविषयी त्यांचे रोखठोक मत नेहमीच उघडपणे मांडत असतात. राजकारणाविषयी त्यांनी केलेल्या अनेक वक्तव्यांची याआधीही जोरदार चर्चा झाली आहे. अशातच आता नागपूर येथे बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राजकारण असा धंदा ज्यात शिव्या खायची तयारी ठेवावी लागते असं विधान केलं आहे. तसेच महिलांसाठी आम्ही योजना देत असू तर तुम्हाला पोटदुखी होण्याचे कारण काय? असा सवालही देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना विचारला आहे.

शुक्रवारी वीजनिर्मिती कंत्राटी कामगार संयुक्त कृती समिती खापरखेडा भव्य कामगार मेळावा आणि सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस बोलत होते. मी वर्ष ३५ राजकारणात विविध पदावंर आहे. कर्तव्यपूर्ती केल्यानंतर जनतेने आमचे आभार मानन्याचा निर्णय घेतला. ३५ वर्षांत मी असं पहिल्यांदा पाहतोय की, ज्यांच्यासाठी काम केले, ते लोक आभार मानन्यासाठी पुन्हा बोलवत आहेत. कारण राजकारण असा धंदा आहे जिथे सकाळपासून संध्याकाळपर्यंत शिव्या खाण्याची तयारी असेल तरच तुम्ही जनतेला न्याय देऊ शकता. कारण या शिव्या नसतात तर सामान्य माणसाच्या अपेक्षा असतात, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

वीज कंत्राटी कामगारांचे कल्याण करायचे असेल तर बावनकुळे-फडणवीस जोडी असेल तरच हे कल्याण होऊ शकते. २०१९ साली चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला ज्यामुळे कंत्राटी कामगारांचा फायदा झाला. आताही बावनकुळे यांनीच पुढाकार घेतल्यामुळे कंत्राटी कामगाराचा लाभ होत आहे. ऊर्जा खाते चालवत असताना बावनकुळेच माझे मार्गदर्शक आहेत, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यावेळी बोलताना लाडकी बहीण योजनेच्या विरोधात काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांचे सहकारी उच्च न्यायालयात गेले आहेत, असेही फडणवीसांनी सांगितले. आमच्या बहिणींची योजना बंद करायची भाषा कराल, तर पुढचे पाच वर्ष सोडाच पण २५ वर्ष तुम्ही सत्तेत येणार नाहीत. आम्ही जर महिलांसाठी, बहिणींसाठी योजना देत असू तर तुम्हाला पोटदुखी होण्याचे कारण काय? असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना केला.

# अहमदाबाद हावडा एक्सप्रेसवर मध्यरात्री दगडफेक?

## गाडी कामठी स्थानकाजवळ थांबवली!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर –** अहमदाबाद हावडा एक्सप्रेसवर गुरुवारी मध्यरात्री समाजकंटकांनी दगडफेक केल्याची जोरदार चर्चा पसरली होती. यामुळे ही गाडी सुमारे १५ मिनिट कामठीनजिकच्या रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आल्याचेही वृत्त होते. रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) मात्र या घटनेचा ईन्कार केला असून, दगडफेकीची घटना घडली नाही तर ट्रॅकवर असलेली गिट्टी उसळल्याने गैरसमज झाल्याचे अधिकारी म्हणाले. अहमदाबाद हावडा एक्सप्रेस नागपूर रेल्वे स्थानकावरून पुढच्या प्रवासाला मार्गस्थ झाली. कामठीकडे जात असताना कॅम्प परिसराच्या लाईनवर गाडीच्या इंजिवर तसेच बाजुच्या डब्याच्या खिडकीवर गिट्टीसारखे दगड आल्यासारखा भास झाला. त्यामुळे एकच उडाला. लोको पायलटने घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन काही अंतरावर तिरोडी स्थानकाजवळ गाडी थांबविली. रेल्वे कंट्रोल रूमला ही माहिती देण्यात आली. त्यानंतर कामठी तसेच नागपूरचे रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि आरपीएफचा ताफा तिकडे धावला. ट्रेनच्या ड्रायव्हर, मॅनेजर तसेच अन्य काहींना विचारपूस करण्यात आली. रात्रीची वेळ असल्याने कुणी दगड भिरकावताना दिसला नाही.सुरक्षेची खात्री केल्यानंतर गाडी पुढच्या प्रवासासाठी रवाना करण्यात आली.

### रेल्वे प्रशासन म्हणते खालची गिट्टी उडाली

त्यानंतर जीआरपी आरपीएफने बरीच शोधाशोध केली. शेवटी रुळवार गिट्टी आली असावी आणि ती चाकात सापडून वर उडाली असावी, असा निष्कर्ष आरपीएफच्या अधिकाऱ्यांनी काढला.दरम्यान, या घटनेसंबंधाने सोशल मिडियावर उलटसुलट वृत्त व्हायरल झाले. त्यामुळे रात्रीच अनेकांनी आरपीएफ, जीआरपी तसेच रेल्वे कंट्रोल रूमकडे विचारणा केली. कुठलीही ठोस माहिती मिळत नसल्याने पहाटे २ वाजेपर्यंत या संबंधाने गोंधळ होता. आज सकाळी मात्र आरपीएफचे सुरक्षा आयुक्त दीपचंद आर्य घटनेचा ईन्कार केला.

# बडनेरा विधानसभा राष्ट्रवादीच्या (शरद पवार) पारड्यात पडण्याची शक्यता

## नितीन कदम राहू शकतात मविआ उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ बडनेरा**

बडनेरा मतदार संघाचे विद्यमान आमदार रवी राणा २०१९ मध्ये बडनेरा येथून तिसऱ्यांदा निवडून आले. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्यामुळे निवडून आले असल्याचे बोलल्या जात आहे. निवडून आल्याननंतर त्यांची भूमिका बदलली.आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये राणा यांचे आव्हान मोडून काढण्यासाठी या मतदारसंघातून इच्छुकांची गर्दी वाढली आहे.लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांच्या पराभवामुळे आता आमदार रवी राणा हे वेगळ्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करीत असल्याची चर्चा आहे. त्यांच्या बदलत्या राजकीय भूमिकेमुळे जनसामान्य नागरिकामध्ये नाराजीचा सुर दिसून येतोय. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या तोंडावर जनसंपर्काची धावपळ त्यामुळे उबठा गटात त्यांच्याविरुद्ध अनेक गट पडल्याचे समोर येत आहे.त्यातचदुसरीकडे



संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांचा व्यापक जनसंपर्क व वाढलेली लोकप्रियता राणा यांना स्वस्थ बसू देईना. दरम्यान नितीन कदम यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) हायकमांडच्या संपर्कात मुंबई-दिल्लीच्या वारीत गुंतले आहेत. मात्र आघाडी झाल्यास हा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे राहण्याची अधिक चर्चा आहे. भाजपातील इच्छुक मात्र हा मतदारसंघ आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.तसेच बडनेरा विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पारड्यात पडणार असल्याची सर्वत्र चर्चा आहे. त्यामागची तशी कारणे सुद्धा समोर येतीये.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने निवडून आलेले राणा व उबाठा गटाचा सातत्याने होत आलेला पराभव यामुळे शरद पवार गटाचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे.आमदार रवी राणा हे तीनही टर्म राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने निवडून आले.त्यांचे त्यावेळी (२००९) मुख्य प्रतिध्वन्दी म्हणून सुलभा खोडके यांचा दारुण पराभव झाला.यावेळी राणा यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा छुपा पाठिंबा असल्याचे बोलले जात होते. त्यानंतर २०१४ ते २०१९ यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्यामुळे राणा विधानसभेत पोहोचले. शिवसेनेच्या सलग तीनदा झालेल्या परभवामुळे येथील शिवसैनिकांची नाराजी सुर धरतेय.दरम्यान अपक्ष उमेदवाराला पाठिंबा देण्यापेक्षा सतत आपल्या बहूआयामी सामाजिक कार्यामुळे नेहमी चर्चेत असलेले,दांडगा जनसंपर्क असलेले संकल्प शेतकरी संघटनेचे नेते नितीन कदम यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी देण्याची मांगणी जोर धरू लागली आहे.शिवसेनेच्या उमेदवाराचा सलग तीनदा पराभव झाल्याने सेनेचा या क्षेत्रासाठी हट्ट आता संपुष्टात आला असून येथील स्थानिक कार्यकरणीत फुट पडल्याची चित्र आहे.२०१४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने २६.०१% मतदान घेऊन राणा हे विजयी झाले. त्याचप्रमाणे शरद पवार यांनी २०१९ पर्यन्त प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष पाठिंबा दिला. यामुळे राणा हे निर्णायक लढत देऊ शकले.या बाबीमुळे स्पष्ट होतेय की शरद पवार यांचा नेहमीच बडनेरा मतदार संघात नेहमीच वर्चस्व राहिले. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन कदम जवळ जवळ निश्चित झाले असुन राणा यांना आगामी विधानसभा निवडणुक अवघड जाणार असल्याचे दिसून येत आहे.

# 'आरटीई' प्रवेशाला १,२१२ पालकांची पाठ

## ४२ प्रवेश रद्द : ४२० जागांकरिता चौथ्या फेरीला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**



आरटीई प्रवेशाची चौथी फेरी सुरू झाली असताना आजवर लॉटरीमध्ये नशिबवान ठरलेल्या ३ हजार २३० बालकांपैकी १ हजार २१२ बालकांच्या पालकांनी प्रवेशाला पाठ दाखविली आहे. तसेच कागदोपत्रांअभावी ४२ प्रवेश रद्द करण्यात आले आहे. तर ४२० रिक्त असलेल्या जागांसाठी २७सप्टेंबरपर्यंत प्रवेश स्वीकारले जात आहे. त्यामुळे यापूर्वी प्रवेशाला पाठ दाखविणाऱ्या १ हजार २१२ बालकांना या फेरीत प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यंदा जिल्ह्यात २३२ शाळांमध्ये २ - हजार ३७६ जागांसाठी आरटीई - प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यासाठी जिल्ह्यातून ६ हजार ६२६ बालकांचे ऑनलाइन अर्ज - प्राप्त झाले. आतापर्यंत पहिल्या प्रमुख फेरीसह तीन फेऱ्यांमध्ये १ हजार ९७६ बालकांचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहे. तर १ हजार २१२ बालकांच्या पालकांनी मात्र शाळांमध्ये प्रवेशाकरिता संपर्कच केला नाही. याशिवाय ४२ प्रवेश रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे ४२० जागा अद्यापही रिक्त आहे. तिसरी फेरी १२ सप्टेंबरलाच संपुष्टात आली. परंतु, जागा रिक्त असल्याने शासनाकडून चौथी फेरी राबविली जात आहे. त्यामुळे आता प्रवेशाला पाठ दाखविणाऱ्या १ हजार २१२ बालकांकरिता या फेरीमध्ये संधी देण्यात आली आहे. त्यामुळेआता यातून किती पालक या फेरीला रिस्पॉन्स देतात, याकडे लक्ष लागले आहे. कारण यंदा ही प्रवेशप्रक्रिया आधीच उशीरा सुरू झाल्याने यातील सर्वच पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश आरटीईच्या प्रतीक्षेत इतरत्र केलेले आहे. परंतु, चौथ्या फेरीत या पालकांना त्यांच्या मर्जीतील शाळा मिळाली तरच ते पालक या फेरीचा लाभ घेणार आहे. हे मात्र निश्चित अन्यथा ही शेवटची फेरी असल्याने यंदा शाळांमध्ये आरटीईचे प्रवेश रिक्त राहण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. या फेरीचे प्रवेश २७ सप्टेंबरपर्यंत स्वीकारले जात आहे.

# गाळमुक्त तलावामुळे १४६ टीसीएम जलसाठा वाढला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

'गाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात आलेल्या कामांमुळे जिल्ह्यात एकूण १४६ टीसीएम पाणीसाठा वाढला आहे. या पाण्याचा उपयोग तलावानजीकच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी होणार आहे. गाळ मिळाल्याने जमिनीचा पोतही सुधारता - येणार आहे.

२०२३-२४ मध्ये मृद व जलसंधारण विभागामार्फत अचलपूर आणि चांदूरबाजार या दोन तालुक्यांतील दहा तलावांतील गाळ काढण्यात आला. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनेंतर्गत तलावातील गाळ काढून तो शेतात पसरवून जमिनीचा पोत सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना मोफत देण्यात आला. दहा तलावांतून तब्बल १ लाख ४६ हजारमृद व जलसंधारण विभागाधी 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनाघनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे तलावातील गाळयुक्त जागा पाणीसाठा करण्यासाठी मोकळी झाली आहे. सोबतच सुमारे १४६.४१ सहस्त्र घनमीटर (टीसीएम) पाणीसाठा गाळ काढण्यामुळे वाढला आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना चांदूरबाजारमधील आठ व अचलपूर तालुक्यातील दोन तलावांत राबविण्यात आली.

अचलपूर तालुक्यातील दोन तलावांतील गाळ काढण्यात आल्याने १०.६ टीसीएम तर चांदूरबाजार तालुक्यातील आठ तलावांतील गाळ काढण्यात आल्याने पाणीसाठा १३५ टीसीएमने वाढला आहे. वाढलेल्या पाणीसाठ्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामात सिंचनाची सोय होणार आहे.

# बंजारा, लमाण समाजाच्या तांडा वस्त्यांना मिळणार गावांचा दर्जा

## स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे आदेश : संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजनेंतर्गत होणार विकास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

आजही डोंगराळ भागामध्ये समुहाने राहणारा बंजारा, लमाण समाज उपजिविकेसाठी सतत भटकंती करीत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य व इतर मूलभूत सुविधेपासून सदर समाज वर्षानुवर्षे दचित आहे. त्यांना न्याय देऊन या समाजाचा विकास करण्याकरिता आता या तांडा वस्त्यांना महसुली गावांचादर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या वस्त्यांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायतीदेखील स्थापन होणार आहे. याची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आले आहे.राज्यातील सुमारे २० ते २५ लाख बंजारा, लमाण्ण समाज अद्यापही समाजाच्या मुल प्रवाहात नसल्याने त्यांना विकासाचा अपेक्षित लाभ झालेला नाही. त्यामुळे या ख्या जाय विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पियानपि गावापासून दूर असलेला बंजारा, लमाण समाजाचा तांडा विकासापासून वंचित असल्यामुळे त्यांचे राहणीमान उंचवाचे, त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी, यासाठी बंजारा, लमाण मांड्यांना स्वतंत्र महसूली गावाच्या दर्जा देत तेथे ग्रामपंचायत स्थापन केली जात आहे. त्यामुळे या वस्त्यांमध्ये पाणी, बोज, शाब्य, अंगणवाडचा, आरोग्य, पथदिवे, गटारे, अंतर्गत रस्ते आदी सुविधा निर्माण केल्या जाणार आहे. येथे ग्रामपंचायत निर्माण करून सामुहिक विकासाच्या विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 'संत सेवालाल महाराज मंजारा, लमाण तांडा समृद्धी योजना' शासनाकडून सुरू करण्यात आली आहे. स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन गावातील ३ किमी अंतराची अट शिथिल करण्यात आली आहे. ज्या तांड्यांची लोकसंख्या १ हजार पेक्षा कमी आहे, अशा ठिकाणी एकापेक्षा जास्त तांडे एकत्रित करून गटग्रामपंचायत स्थापन केली जाणार आहे. २ किमी परिसरातील ३५० लोकसंख्या असलेल्या वसाहतींनासुद्धा पुनर्वसित गावाप्रमाणे तांडयांचा महसूली गावाचा दर्जा देण्यात येणार आहे.तसेच या गावांचा विकास करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण केले जाणार आहे. प्रत्येक तांडासाठी मंजूर आराखड्याप्रमाणे किमान ३० लाख इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# सालनापूर येथील जिल्हा परिषद शाळेतर्फे स्वच्छ ही सेवा अभियान स्वच्छता करून गावकऱ्यांना दिला स्वच्छतेचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२१धामणगाव रेल्वे**

विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटल्याने विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानात हिरारीने भाग घेऊन शाळेतील विद्यार्थी गावाची स्वच्छता करताना दिसून येत आहेत. तालुक्यातील सालनापुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे विद्यार्थी परिसराची स्वच्छता करून गावकऱ्यांना स्वच्छतेच्या महत्वाबाबत जनजागृती करताना दिसून येत आहेत.



सालनापूर येथे जि.प. शाळा सालनापूर कडून स्वच्छ ही सेवा अभियान अंतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन .पंतप्रधान तसेच मुख्यंमत्री यांनी राबवलेली स्वच्छ ही सेवा अभियानार्तंगत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सालनापुर येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . सकाळी सामुहिक स्वच्छतेची शपथ विद्यार्थानी त्याचबरोबर शिक्षकांनी घेतली व शासनाच्या अधिकृत लिंकवर नोंदही करण्यात आली . शाळेत मुलांनी संपूर्ण वर्ग साफसफाई केली . गावात स्वच्छता प्रभात फेरी काढून स्वच्छतेचे घोषवाक्य म्हटले . घराजवळील कचर्याबाबत लोकांना विद्यार्थ्यांनी विनंती करून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले .मुलांनी घोषवाक्य पट्या तयार केल्या . शाळेत आणि घरातील टाकावू वस्तुपासून शोभेच्या वस्तु तयार करण्यात आली . कागदापासून विविध वस्तु बनविण्यात आले.भाषणे , चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा चे आयोजन करण्यात आले. स्वच्छता पंधरवाड्यात सर्व नागरिकानी सहभाग घेवून आपला गाव परिसर स्वच्छ करण्यासाठी देशकार्यात हातभार लावण्याचे आव्हाहन शाळेकडून करण्यात आले .या कार्यक्रमात शाळेतील व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सदस्य,मुख्याध्यापक विनोद राठोड यांनी सहभाग घेतला .

# धामणगाव बाजार समितीमध्ये नवीन सोयाबीन खरेदीचा शुभारंभ

## सोयाबीनला प्रतिक्विंटल ५ हजार ५१ रुपये भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ धामणगाव रेल्वे**

येथील बाजार समितीत शुक्रवार नवीन सोयाबीन खरेदीचा शुभारंभ सभापती कविता गावंडे यांच्या हस्ते करण्यात आला. या नविन सोयाबीनला प्रतिक्विंटल ५ हजार ५१ दर मिळाला.

शुभारंभाप्रसंगी तालुक्यातील गव्हाफरकाडे येथील शेतकरी रविन्द्र बकाराम राघोर्ते यांनी अडते महेश गंगण यांचे आडतमध्ये खरेदीदार मे. जय माँ ट्रेडर्स मनिष भट्टड यांना



सोयाबिन विक्री केले. या शेतकऱ्याला ५ हजार ५१ हजार रूपयाचा भाव देण्यात आला. तसेच पवन लाहोटी यांचे आडत मध्ये शेतकरी प्रविण रंगराव धोटे यांनी विक्री केल्याने या दोन्ही शेतकऱ्यांचा सभापती कविता गावंडे यांचे हस्ते शालव श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी समितीचे संचालक रवि भुतडा, दिनेश जगताप, देवराव बमनोटे, मुकुंद माहोरे, राधेश्याम चांडक, प्रमोद रॉधे, गिरीष भुतडा, संगीता गाडे, जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, खरेदीदार संजय अग्रवाल, यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात पोषण सप्ताह साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित स्थानिक इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील गृहअर्थशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय पोषण सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते, या कार्यक्रमाला अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सिमा अढाऊ व प्रमुख मार्गदर्शक व परीक्षक प्रा. सोनल शहा होत्या याच वेळी गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रा. सोनल शहा यांच्या हस्ते करण्यात आले. गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची अध्यक्ष कु. वैष्णवी महल्ले बि.ए. भाग-३, उपाध्यक्ष कु. ईश्वरी ठाकरे बि.ए. भाग-२, कोषाध्यक्ष कु. राधिका बोबडे बि.ए. भाग-१, सचिव कु. मृदुला पाटील एम.ए. भाग-१ यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले व अभ्यास मंडळ गठीत करण्यात आले.या वेळी पोषण सुंदरी व एक मिनिट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पोषण सुंदरी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. नंदिनी इंगळे बि.ए. भाग-१, द्वितीय क्रमांक कु. ईश्वरी ठाकरे बि.ए. भाग-२ तर कु. सायली देशमुख एम.ए. भाग-१ हिने तृतीय क्रमांक पटकाविला. एक मिनिट स्पर्धेची विजेती कु. भुमिका व्यवहारे हिने प्रथम क्रमांक तर द्वितीय क्रमांक कु. वैदेही हिरणवाळे व कु. वेदिका पिंपळकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. पुनम चौधरी यांनी केले प्रमुख मार्गदर्शक प्रा. सोनल शहा यांनी विद्यार्थीनींना पोषणाचे महत्व पटवुन दिले. प्राचार्य डॉ. सिमा अढाऊ यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये कडधान्याचे महत्व, जंक फुडचे दुष्परीणाम यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. अनुराधा पाथरकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले आहे.

# गुरुजी, तीन वर्षे झाले तुम्हाला आता द्यावी लागणार परीक्षा

## शिक्षक संघटनांचा प्रचंड विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

तीन वर्षांपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करण्यात आलेल्यांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. त्यांना आता शासकीय सेवेत कायम करण्याची वेळ येताच पुन्हा एक परीक्षा द्यावी लागणार आहे. तशी घोषणा शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली आहे. या परीक्षेला शिक्षक संघटनांकडून विरोध सुरू झाला. त्यामुळे घोषणेनंतर शासन निर्णय अजूनही निघालेला नाही; मात्र पुन्हा एकदा परीक्षा द्यावी लागणार आणि यात उत्तीर्ण न झाल्यास घरी बसावे लागणार असल्याने शिक्षणसेवकांमध्ये धाकधूक वाढली आहे. या शैक्षणिक सत्रात पवित्र




पोर्टलच्या माध्यमातून नुकतीच शिक्षक भरती प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यात पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात १२७ शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली. यापूर्वी शिक्षण सेवकांचा तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला की, ते कायमस्वरूपी शिक्षक म्हणून नियुक्त होत होते. शिक्षणसेवकाचा कालावधी हा सुरक्षित असा होता; मात्र आता पुन्हा परीक्षा द्यावी लागणार असल्याने जिल्ह्यातील या शिक्षकांची चिंता वाढली आहे. शिक्षक संघटनेचा परीक्षेला विरोध आहे.

**महाराष्ट्र शिक्षक परिषद घेणार परीक्षा**

सध्या शिक्षकांना शिक्षक बनण्यासाठी पात्रता परीक्षा द्यावी लागते. तीन वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षण सेवकांची परीक्षा राज्य परीक्षा परिषदेद्वारे घेण्यात येणार आहे. ही उत्तीर्ण केल्यानंतर शिक्षणसेवकांना सेवेत कायम करण्यात येणार आहे. अन्यथा घरी बसावे लागणार आहे. दरम्यान, शिक्षण सेवकांना या परीक्षेसाठी पुन्हा तयारी करावी लागणार आहे.

**अल्प मानधन, त्यात पुन्हा परीक्षा**

जिल्ह्यात तीन वर्षांपूर्वी शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यातील शिक्षक कार्यरत आहेत. त्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे. शिक्षणसेवक म्हणून नोकरीला लागलेल्या शिक्षकांना तीन वर्षांपर्यंत १६ हजार रुपये प्रतिमाह मानधन दिले जाते. तीन वर्षांनंतर आपल्याला पूर्ण वेतन मिळेल, या अपेक्षेने शिक्षणसेवक म्हणून शिक्षक सेवा देतात. पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने शिक्षक चिंतेत पडले आहेत.

# पुरवठा विभागाला आता साखर आणि तेलाची प्रतीक्षा लाभार्थी आनंदाचा शिधापासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

गौरी-गणपतीत रेशन लाभार्थीचेही तोंड गोड करता यावे, यासाठी राज्य शासनाने आनंदाचा शिधा वाटपाचा निर्णय घेतला होता. मात्र, आनंदाचा शिधामधील सर्व वस्तू उपलब्ध झाल्या नसल्याने आनंदाचा शिधा वाटता आला नाही. आश्चर्याची बाब म्हणजे, आता गणेशोत्सव संपून गपपती बाप्पा आपल्या घरी गेले तरीसुद्धा आनंदाचा शिधामधील जिन्नस अद्याप मिळालेले नाहीत. अशात आनंदाचा शिधापासून रेशन लाभार्थी वंचित असून, गणेशोत्सवातील शिधा आता नवरात्रोत्सवातच मिळणार, अशी स्थिती दिसून येत आहे.

भाजप-शिंदे सेनेचे सरकार राज्यात आल्यानंतर त्यांनी गोरगरिबांच्या घरातही सण-उत्सवात गोडधोड तयार करता यावे, यासाठी आनंदाचा शिधा वाटपाचा निर्णय घेतला. या अंतर्गत राज्य शासनाकडून गौरी-गणपती, गुढीपाडवा व दिवाळीत आनंदाचा शिधाचे वाटप केले जाते.आताही गौरी-गणपतीनिमित्त राज्य शासनाकडून आनंदाचा शिधा वाटपाचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, पाच जिन्नस असलेल्या आनंदाचा शिधामधील सर्व जिन्नस अद्याप पुरवठा विभागाला मिळालेले नाहीत. परिणामी, गणेशोत्सव संपला तरीसुद्धा लाभार्थ्यांना आनंदाचा शिधाचे वाटप करण्यात आलेले नाही.

अशात आता उरलेले दोन जिन्नस कधी मिळणार व ते आल्यानंतर तालुक्यांना शिधा कधी वितरीत होणार हा प्रश्नच आहे. या सर्वात आणखी काही दिव जाणार यात शंका नाही. त्यांतर रेशन दुकानदारांकडून आनंदाचा शिधा वाटप होणार आहे. यामुळे आता नवरात्रीतच शिधा मिळणार असे दिसत आहे.

### गणेशोत्सव संपूनही वाटप नाहीच




### दोन दिवसात येणारअसल्याची शक्यता

पाच वस्तू असलेल्या आनंदाचा शिधामध्ये एक किलो चणाडाळ, एक किलो रखा, एक किलो साखर, एक किलो तेल तसेच एक विशेष पिशवी असते. विशेष पिशवीत उर्वरित चारही वस्तू टाकून आनंदाचा शिधा रेशन लाभार्थीना दिला जातो. असे असतानाच जिल्ह्याला आतापर्यंत फक्त रवा, पिशवी व चणाडाळ प्राप्त झाली आहे तर साखर आणि तेल अद्याप मिळालेले नाही. येत्या दोन दिवसात या दोन्ही वस्तू मिळणार असल्याचे पुरवठादाराने आश्वासन दिल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

### दिवाळीतही मिळणार

राज्य शासनाकडून सण-उत्सवात रेशन लाभार्थीना आनंदाचा शिधा वाटप केला जात आहे. गौरी-गणप- तीसाठी मंजूर करण्यात आलेला आनंदाचा शिधा आता उशिराने मिळणार आहे. मात्र लगेच दिवाळीतही लाभार्थीना आनंदाचा शिधा मिळणार.

# निवडणुका जाहीर होण्याआधीच पहिली यादी जाहीर,११ उमेदवारांची घोषणा

## धामणगाव रेल्वे मतदार संघातून निलेश विश्वकर्मा यांना उमेदवारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**


महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती आणि विरोधकांच्या महाविकास आघाडीत जागावाटपावरून रस्सीखेच सुरू असतानाच प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीने आपली पहिली उमेदवार यादी जाहीर करून टाकली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर आणि अन्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत ही नावे जाहीर करण्यात आली. पहिल्या यादीत वंचितने ११ उमेदवारांची घोषणा केली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या पहिल्या यादीतील मतदारसंघांमध्ये रावेर, सिंदखेड राजा, वाशिम, धामणगाव रेल्वे, नागपूर दक्षिण पश्चिम, साकोली, नांदेड दक्षिण, लोहा, छत्रपती संभाजीनगर पूर्व, शेवगाव, खानापूर या मतदारसंघांचा समावेश आहे.

दरम्यान, आमच्यावर




### कोणत्या मतदारसंघातून कोणाला मिळाली संधी?

१. रावेर - शमिभा पाटील
२. सिंदखेड राजा - सविता मुंढे
३. वाशिम- मेघा किरण डोंगरे
४. धामणगाव रेल्वे - निलेश विश्वकर्मा
५. नागपूर दक्षिण पश्चिम - विनय भांगे
६. साकोली - डॉ. अविनाश नन्हे
७. नांदेड दक्षिण- फारुक अहमद
८. लोहा - शिवा नरंगले
९. छत्रपती संभाजीनगर पूर्व - विकास दांडगे
१०. शेवगाव - किसन चव्हाण
११. खानापूर - संग्राम माने




काहीही आरोप होत असले तरी आम्ही राज्यात सध्या सर्वच प्रमुख पक्षांचं सुरू असलेलं एकजातीय राजकारण मोडून काढण्यासाठी विविध समाजातील उमेदवारांना संधी दिली आहे, असं या पत्रकार परिषदे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

अमरावती जिल्ह्यातून धामणगाव रेल्वे मतदार संघातून महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा यांना उमेदवारी जाहीर झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे

# तीर्थक्षेत्र रिद्धपूर विकास आराखड्यास शिखर समितीची मंजूरी

## २५ कोटी रुपयांची वित्तीय मान्यता प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१मोर्शी**

महानुभावपंथीयांची काशी, गोविंदप्रभू यांचे देवस्थान व मराठी भाषेचे जन्मस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूरच्या विकासासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्यासाठी आमदार देवेंद्र भुयार यांनी मागील ४ वर्षापासून सतत पाठपुरावा करून प्रशासनाच्या विविध बैठकांचे आयोजन करून शासनाकडे तीर्थक्षेत्र विकास आराखडा सादर केल्यामुळे आमदार देवेंद्र भुयार यांच्या मागणीची दखल घेऊन राज्य शासनाने तीर्थक्षेत्र रिद्धपूर विकास आराखड्यास शिखर समितीची मंजूरी प्रदान करून २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार देवेंद्र भुयार यांनी दिली.



तीर्थक्षेत्र रिद्धपूर विकास आराखड्यास शिखर समितीची मंजुरी २५ कोटी रुपयांची वित्तिय मान्यता प्राप्त करण्यात आली असून यामध्ये रिद्धपूर तीर्थक्षेत्रातील तळमजल्याचे बांधकाम करणे, पहिला माळा बांधकाम करणे, बसस्थानक व सभागृह बांधकाम करणे, वाचनालय आणि अभ्यासिका बांधकाम करणे, प्रसाधन गृह बांधकाम करणे, पिवळविहीर येथे सभागृहाचे बांधकाम करणे, पाणीपुरवठा, विद्युतीकरण अग्नीशमण व्यवस्था इ. निर्माण करणे, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, सौर उर्जा, दिव्यांगांसाठी रैंप व फर्निचर आदी कामे करणे, संरक्षण भिंत बांधकाम करणे, अंतर्गत रस्ते करणे, प्रवेश द्वार निर्माण करणे, जमिनीखालील पाण्याची टाकीचे बांधकाम, पाण्याची टाकी व पंप हाऊस यासह विविध कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली असून या सर्व कामांसाठी राज्य शासनाने २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल आमदार देवेंद्र भुयार यांनी राज्य शासनाचे आभार मानले.

आमदार देवेंद्र भुयार यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे रिद्धपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता मिळाल्यामुळे श्री. वाईंदेशकर बाबा, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दत्ता ढोमने, गोपाल जामठे, रिद्धपूर येथील सरपंच उपसरपंच ग्राम पंचायत सदस्य, तात्यासाहेब मेश्राम, पंकज हरणे, यांच्यासह आदी मंडळींनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार देवेंद्र भुयार यांचे आभार मानले.

# पुसदा गावात मोबाईल दुकानदाराला दिली नकली शंभरची नोट



## अमरावती जिल्ह्यात शंभरच्या नकली नोटा मोठ्या प्रमाणात चलनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ पुसदा**

अमरावती जिल्ह्यातील पुसदा गावात ऐका मोबाईल रिचार्ज दुकानदाराला नकली शंभरची नोट देण्यात आली आहे हुबेहूब असली दिसणारी नोट चलनात आली आहे मात्र नोटीचा रंग जात असल्यामुळे व नोटीचा पेपर पातळ असल्यामुळे ही नोट तात्काळ ओळखू येते संपुर्ण अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नकली नोटांचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे नकली नोटांची देवाण-घेवाण करणारी टोळी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाली आहे अनेक छोट्या मोठ्या दुकानदारांना नकली नोटांचा गंडा घातल्या जात आहे अशातच शेतकरी शेतमजूर वर्ग मोठ्या प्रमाणात नकली नोटांना त्रासले आहे याकडे अमरावती पोलीस प्रशासन लक्ष देतील का हे पहान महत्त्वाचं ठरणार आहे.

# परिवहन आयुक्तांशी आरटीओ संघटनेची चर्चा फिस्कटली २४ सप्टेंबर पासून बेमुदत संप अटळ : अनाकलनीय बदलामुळे कर्मचारी हवालदिल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटना (शासन मान्यताप्राप्त ) राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांची गेली ६६ वर्ष यशस्वीपणे प्रतिनिधित्व करीत आहे. संघटनेच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या जीवनात सेवा , अर्थविषयक व इतर अनुषंगिक प्रश्न जेव्हा जेव्हा निर्माण झाले, तेव्हा तेव्हा नेहमीच राज्यांचे हित लक्षात घेऊन मागण्याची सनद सरकारला सादर करण्यात आली आहे . अन्यायकारक शासन धोरणाच्या विरोधात मात्र जबरदस्त आंदोलनात्मक शड्डू ठोकण्यात सुद्धा संघटना कधीही कमी पडलेली नाही. गेल्या दोन वर्षात प्रशासकीय विविध अन्यायकारक तरतुदीमुळे अनेक सेवाविषयक प्रशासकीय गुंतागुंत निर्माण झाली आहे. महसूल विभागीय बदल्याचे धोरण रद्द न करणे , समायोजन करून कर्मचाऱ्यांना भयभीत करणे , विभागीय परीक्षा सारख्या संवेदनशील क्षेत्रात अनाकलनीय बेछूट बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील कर्मचारी हवालदिल झाले आहेत. आकृतीबंधाची सुयोग्य अंमलबजावणी न करणे , कामकाजात सुसूत्रीकरण येण्यासाठी नेमण्यात आलेल्या कळस्कर समितीच्या हितकारक कार्यपद्धतीची अंमलबजावणी न करणे, विभागीय स्तरावरील आस्थापना विषयक ज्येष्ठता व बदल्याचें संयोजन याबाबत कोणतीही कर्मचारीभिमुक सकारात्मक कार्यवाही न झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील



आरटीओ कर्मचारी संतप्त होऊन दिनांक २४ सप्टेंबर २०२४ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार पक्का केला आहे. आगामी संप , आंदोलनाची नोटीस परिवहन आयुक्त व प्रधान सचिव (परिवहन) यांना देण्यात आलेली आहे. सदर नोटीसीच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित मागण्यावर निर्णयात्मक चर्चा करण्यासाठी मुंबईत परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी त्यांच्या दालनात संघटना प्रतिनिधीसह चर्चा घडवून आणण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते . आश्वासनाशिवाय कोणतीही सकारात्मक चर्चा न झाल्याने बैठक निष्फळ ठरली. यापूर्वीही अशा चर्चासत्राचा अनुभव संघटनेला असल्याने केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेण्याचा प्रशासनाचा उद्देश या चर्चेत दिसून येत होता. त्यामुळे चर्चे संदर्भात संघटना प्रतिनिधी अधिकच संतप्त झाले होते . जोपर्यंत संघटनेने केलेल्या मागणी संदर्भातील कार्यवाही संबंधात लेखी स्वरुपात पत्र दिले जात नाही , तोपर्यंत संपाबाबत कोणताही पुनर्विचार न करण्याचा निर्णय संघटनेने घेतला असल्याचे मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनाचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी सांगितले.

**संप कालावधीत शासनाचा रोजचा ५० कोटीच्या वर महसूल बुडणार**

वाहना संदर्भात दैनंदिन होणारे सर्व कामे ठप्प पडल्याने शासनास दर दिवसाला प्राप्त होणाऱ्या ५० कोटीच्यावर महसुलापासून वंचित राहावे लागेल .राज्यातील आरटीओ कार्यालय तसेच राज्यात विविध ठिकाणी उभारलेल्या सीमा तपासणी नाके यावर सुद्धा कर्मचारी संपावर जाणार असल्याने कामकाजावर प्रचंड मोठा फरक पडणार आहे.यामुळे राज्य शासनाच्या महसुलाची हानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही . म्हणून शासनाने याची गंभीर दखल घेऊन , कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी केली आहे.